"मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण" या योजनेच्या अंमलबजावणीमध्ये सुधारणेसह व्याप्ती वाढविणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**महिला व बाल विकास विभाग.**
**शासन निर्णय क्रमांक- मबावि २०२४/प्र.क्र.९६/कार्या-२,**
नवीन प्रशासकीय इमारत, तिसरा मजला, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक:-२५ जुलै, २०२४.

**संदर्भ:-**

१) महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण २०२०/प्र.क्र.१३१/कार्या-२, दि.३१.०१.२०२२.

२) महिला व बाल विकास विभाग, शासन परिपत्रक क्र. संकीर्ण २०२०/प्र.क्र.१८/कार्या-२, दि.२९.०३.२०२२.

३) महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र. मबावि २०२४/प्र.क्र.९६/कार्या-२, दि.२८.०६.२०२४ व दि.०३.०७.२०२४.

४) महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र. मबावि २०२४/प्र.क्र.१५६/कार्या-२, दि.०५.०७.२०२४.

५) महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र. मबावि २०२४/प्र.क्र.१५१/कार्या-२, दि.०८.०७.२०२४.

६) महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र. मबावि २०२४/प्र.क्र.९६/कार्या-२, दि.१२.०७.२०२४.

**प्रस्तावना :-**

राज्यातील महिलांच्या आर्थिक स्वातंत्र्यासाठी आणि त्यांच्या आरोग्य आणि पोषणात सुधारणा करण्यासाठी आणि कुटुंबातील त्यांची निर्णायक भूमिका मजबूत करण्यासाठी महाराष्ट्र राज्यात "मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण" योजनेची अंमलबजाणी करण्यात येत आहे.

सदर योजनेच्या प्रभावी अंमलबजावणी करताना वेळोवेळी येणाऱ्या प्रशासकीय तसेच तांत्रिक अडी-अडीचणीचे तात्काळ निराकरण करण्यासाठी शासनस्तरावर मा.मुख्य सचिव यांच्या

अध्यक्षतेखाली विविध विभागाच्या सचिवांचा समावेश असलेली “Empowered committee” शासन निर्णय दि.०८.०७.२०२४ अन्वये गठीत करण्यात आली आहे. संदर्भ क्र.६ येथील शासन निर्णयान्वये सदर योजनेच्या अंमलबजावणी प्रभावीपणे व सुलभतेने होण्यासाठी व्याप्ती वाढविण्यात आली आहे. "मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण" या योजनेसंदर्भात दि.२३.०७.२०२४ रोजी मा.मंत्रीमंडळ बैठकीमध्ये योजनेच्या अंमलबजावणीत अंशत: सुधारणा करण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यानुषंगाने सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

"मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण" या योजनेच्या अंमलबजावणी प्रभावीपणे व सुलभतेने होण्यासाठी खालीलप्रमाणे मान्यता देण्यात येत आहे:-

१) सदर योजनेंतर्गत गठीत करण्यात आलेल्या तालुका/वार्डस्तरीय अशासकीय सदस्यांची समितीऐवजी विधानसभा क्षेत्रनिहाय समिती जिल्हाधिकारी यांनी गठीत करावी. सदर समितीमध्ये शासकीय सदस्यांची नेमणूक जिल्हाधिकारी यांनी आवश्यकतेनुसार करावी. तसेच सदर समितीमध्ये तीन अशासकीय सदस्य असतील. त्यापैकी एक सदस्य अध्यक्ष राहतील. सदर समितीच्या अध्यक्षांची व इतर दोन अशासकीय सदस्यांची निवड सदर जिल्ह्याच्या पालकमंत्री यांच्यामार्फत करण्यात येईल. सदर विधानसभा क्षेत्रनिहाय समितीस त्यांच्या क्षेत्रातील लाभार्थ्यांची यादी अंतिम करण्याचे अधिकार असतील.

२) तालुका/वार्ड स्तरावरील समितीतील अशासकीय सदस्य वगळून उर्वरित शासकीय सदस्यांची समिती प्रशासकीय कामकाजासाठी कार्यरत राहील. तसेच जिल्हाधिकारी यांना सदर समितीमध्ये आवश्यकतेनुसार शासकीय सदस्यांमध्ये बदल करता येईल. या समितीने जिल्ह्यात प्राप्त झालेल्या अर्जाची तपासणी करावी व संभाव्य पात्र लाभार्थी महिलांच्या याद्या जिल्हाधिकारी यांच्याकडे सादर कराव्यात. त्रुटीपुर्तता अभावी अपात्र ठरलेल्या अर्जदार महिलांची यादी संबंधितांना त्रुटीपुर्ततेसाठी पाठविण्यात यावी.

३) जिल्हाधिकारी यांनी त्यांच्या जिल्ह्यातील तालुका/वार्ड स्तरावरील प्राप्त झालेल्या महिला लाभार्थ्यांच्या पात्रता याद्यांचे विधानसभा क्षेत्रनिहाय वर्गीकरण करुन संभाव्य पात्र लाभार्थी महिलांच्या याद्या अंतिम निर्णयासाठी विधानसभा क्षेत्रनिहाय समितीकडे मान्यतेसाठी सादर करण्यात याव्यात.

४) जिल्हाधिकारी यांच्याकडून विधानसभा क्षेत्रनिहाय प्राप्त झालेल्या संभाव्य पात्र महिला लाभार्थ्यांची यादी विधानसभा क्षेत्रनिहाय समितीने अंतिम करावी. तद्नंतर सदर अंतिम करण्यात आलेली यादी जिल्हाधिकारी यांच्याकडे सुपुर्द करण्यात यावी. जिल्हाधिकारी यांनी त्यांच्या यंत्रणेद्वारे अंतिम पात्र महिला लाभार्थ्यांची नोंद प्रणालीवर करावी. तदनंतर जिल्ह्यातील पात्र महिला लाभार्थ्यांची यादी आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणे यांना सादर करावी.

५) अपात्र झालेल्या लाभार्थ्यांनी त्रुटीपुर्तता केल्यानंतर त्यांचा पात्रतेबाबत निर्णय वरील कार्यपध्दतीनुसार करण्यात येईल.

६) संदर्भ क्र.६ येथील दि.१२.०७.२०२४ च्या शासन निर्णयातील परिच्छेद क्र.६ मधील “NULM यांचे समूह संघटक (CRP)” यांच्याऐवजी “समूह संघटक-CRP (NULM, MSRLM व MAVIM)” असे वाचावे.

७) संदर्भ क्र.६ येथील दि.१२.०७.२०२४ च्या शासन निर्णयातील परिच्छेद क्र.९ मधील ग्रामस्तरीय समितीमार्फत नंतर येणारा **“अंतिम”** हा शब्द वगळण्यात येत आहे.

८) संदर्भ क्र.६ येथील दि.१२.०७.२०२४ च्या शासन निर्णयातील परिच्छेद क्र.१२ मधील “NULM यांचे समूह संघटक (CRP)” यांच्याऐवजी “समूह संघटक-CRP (NULM, MSRLM व MAVIM)” असे वाचावे.

९) "मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण" या योजनेची व्यापक प्रचार व प्रसिध्दी, प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी/तपासणी करणे, तांत्रिक अडचणींचे निराकरण करणे इत्यादींसाठी लागणाऱ्या तालुका/वार्ड/जिल्हा स्तरावरील अतिरिक्त मनुष्यबळाचा खर्च तसेच इतर प्रशासकीय खर्च भागविण्यासाठी संदर्भ क्र.१ च्या शासन निर्णयानुसार जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत मिळणाऱ्या एकूण नियतव्ययाच्या किमान ३% प्रमाणे प्राप्त होणाऱ्या एकूण निधीमधून १% पर्यंतचा निधी **"विशेष बाब"** म्हणून जिल्हाधिकारी यांच्यामार्फत संबंधित जिल्ह्यात "मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण" या योजनेसाठी खर्च करण्यास मान्यता देण्यात येत आहे. सदर मान्यता केवळ सन २०२४-२५ या आर्थिक वर्षासाठीच राहील.

२. सदर शासन निर्णय दि.२३.०७.२०२४ रोजीच्या मा.मंत्रीमंडळाच्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०२४०७२५१७३२३८९५३० असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

ANUP KUMAR YADAV

Digitally signed by ANUP KUMAR YADAV
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=MINORITIES DEVELOPMENT DEPARTMENT, 2.5.4.20=5f3908d24b2568f3b31ae7a2607b77e47b9cced8530762f703728fbf48d2b4f9, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=04D0A29A400CB59ACDA95D417719F74B7810596B06FB1A4D38C8EA417B170BB0, cn=ANUP KUMAR YADAV
Date: 2024.07.25 19:08:40 +05'30'

**(डॉ.अनुपकुमार यादव)**
**सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई,
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. मा.उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
४. मा.अध्यक्ष/उपाध्यक्ष/सदस्य, विधानसभा/विधान परिषद, विधानमंडळ, मुंबई,
५. मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा/विधान परिषद, विधानमंडळ, मुंबई,
६. मा.मंत्री, महिला व बाल विकास यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
७. सर्व मा.मंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
८. मा.मुख्य सचिव, मंत्रालय मुंबई,
९. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई,
१०.मुख्य कार्यकारी अधिकारी तथा विशेष कार्य अधिकारी, धारावी पुनर्विकास प्राधिकरण, मुंबई
११.सचिव, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई,
१२.विभागीय आयुक्त (सर्व),
१३.आयुक्त, महानगरपालिका (सर्व)
१४.आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे,
१५.जिल्हाधिकारी (सर्व),
१६.महालेखापाल - महाराष्ट्र-१/२ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई / नागपूर,
१७.महालेखापाल - महाराष्ट्र-१/२ (लेखा परिक्षा), मुंबई / नागपूर,
१८. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
१९.सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
२०.सह सचिव, उपसचिव, अवर सचिव महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई,
२१.सर्व सह आयुक्त/उप आयुक्त / विभागीय उपआयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणे,

२२.सर्व विभागीय उपआयुक्त, महिला व बाल विकास (आयुक्तालय पुणे मार्फत),
२३.सर्व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी (आयुक्तालय पुणे मार्फत),
२४.महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई (सर्व कार्यासने),
२५.निवड नस्ती, कार्यासन-२